सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्थांमध्ये मागसवर्गीय शिक्षक पदे भरणे सोयीचे व्हावे म्हणून अर्हता प्राप्त मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी करून रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याची योजना सुरू आहे. या नाव नोंदणीस उत्तम प्रतिसाद मिळत असून सन २०१७-२०१८ वर्षात एकूण ३२ मागासवर्गीय उमेदवारांची विविध विषयांसाठी नाव नोंदणी केलेली आहे.

५) **जाहिरात मान्यता**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील दि. ८/१२/१९९७ व दि-२४/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्धारित टक्केवारीप्रमाणे पदे आरक्षित ठेवून जाहिराती मंजूर करुन दिल्या जातात. सन २०१७-२०१८ वर्षात विविध महाविद्यालयांकडून आलेले ४४ जाहिरातीचे मसुदे मंजूर करण्यात आले.

६) **मागासवर्गीय कर्मचारी तक्रार निवारण**

मागासवर्गीय शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी विशेष कक्ष विभागास प्राप्त झाल्यानंतर या तक्रारीचे निराकरण केले जाते.

७) **अनु. जाती/अनु.जमाती विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग**

मागासवर्गीय व अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी यु. जी. सी. कडून मान्यता प्राप्त खालील योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विद्यापीठाद्वारे राबविण्यात येतात.

अ) नेट परीक्षा मार्गदर्शन

विद्यापीठातील अनु. जाती, अनु. जमाती तसेच अल्पसंख्यांक उमेदवारांना नेट परीक्षेसाठी मार्गदर्शक वर्ग योजना यु.जी.सी. कडून मंजूर झालेली आहे. या योजनेकरिता समन्वयक म्हणून डॉ. के. डी. सोनवणे, मायक्रोबायालॉजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर हे काम पाहत आहे.

ब) रेमिडियल कोचिंग स्कीम

मागासवर्गीयांसाठी रेमिडियल कोचिंग स्कीम ही योजना यु.जी.सी. कडून मंजूर झालेली आहे. सन २०१७-२०१८ या अहवाल वर्षात विद्यापीठातील सर्व अधिविभागातील विद्यार्थ्यांना 'SWOT Analysis for Self and Career Development' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानाचा एकूण ३३ विद्यार्थ्यानी लाभ घेतला. अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्याना या योजनेचा चांगला फायदा होत आहे. या योजनेचे समन्वयक म्हणून डॉ. पी. एन. वासंबेकर, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग हे काम पाहत आहेत.

क) समान संधी कक्ष

शिवाजी विद्यापीठास यु.जी.सी कडून समान संधी कक्ष या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. समान संधी कक्ष या योजनेच्या समन्वयक म्हणून डॉ. श्रीमती पी. एस. पाटणकर, शिक्षणशास्त्र अधिविभाग या काम पाहत आहेत.

ड) स्किम फॉर पर्सन वुईथ डिसएबिलीटी

यु.जी.सी कडून स्किम फॉर पर्सन वुईथ डिसएबिलीटी ही योजना विद्यापीठासाठी मंजूर झालेली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्किम फॉर पर्सन वुईथ डिसएबिलीटी या योजनेच्या समन्वयक म्हणून डॉ. श्रीमती प्रतिभा देसाई समाजशास्त्र अधिविभाग या काम पाहत आहेत.

इ) सेवापूर्वी भरती स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

मागासवर्गीय उमेदवारांसाठी सेवापूर्व मार्गदर्शन परीक्षा योजना यु.जी.सी. कडून विद्यापीठास मंजूर झालेली आहे. अहवाल वर्षात विद्यापीठाच्या विविध अधिविभागातील १०० विद्यार्थ्यांनी या योजनेसाठी प्रवेश घेतला होता. त्यापैकी ८ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत. अहवाल वर्षात या योजनेकरीता समन्वयक म्हणून डॉ. जगत कराडे, समाजशास्त्र अधिविभाग हे काम पाहत होते.

■◆■

आरोग्य विभाग

शिवाजी विद्यापीठ आरोग्य केंद्रामार्फत अधिविभागातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी तसेच त्यांचे नातेवाईक व बाह्य रूग्ण यांचेवर वैद्यकीय उपचार करण्यात येतात.

आरोग्य केंद्रामध्ये नियमित सेवेतील कार्यरत कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत

अ.क्रं	सेवकाचे नांव	पद
१	डॉ. तुकाराम खासेराव पाटील	मानसेवी वैद्यकीय अधिकारी
२	डॉ. श्रीमती विनीता अतुल रानडे	वैद्यकीय अधिकारी
३	श्रीमती. रेखा चरणदास घावरे	सार्वजनिक आरोग्य परिचारिका
४	श्रीमती. मीलन मधुकर कोरगांवकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ
५	श्री. संजय वसंतराव गवळी	वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ
६	श्री. निशिकांत कमलाकर पलंगे	औषध निर्माता
७	श्री. प्रमोद लक्ष्मण कर्जुले	'क्ष' किरण तंत्रज्ञ
८	श्री. प्रदीप जगन्नाथ टेकाळे	वरिष्ठ सहाय्यक
९	श्री. संभाजी महादेव पाटील	ड्रेसर
१०	श्री. रमेश निवृत्ती पाटील	नर्सिंग ऑर्डरली
११	श्री. जीवन नारायण जाधव	शिपाई

आरोग्य केंद्रातील मानद वैद्यकीय तज्ञ खालील प्रमाणे :

अ.क्रं	मानद वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नाव	तज्ज्ञ
१	डॉ. श्रीमती ज्यो. उ. भद्रे	स्त्री रोग तज्ज्ञ
२	डॉ. नि. दुं गुरव	कान,नाक,व घसा तज्ज्ञ
३	डॉ. हि. ला. वाघाडिया	अस्थिरोग तज्ज्ञ
४	डॉ. सु. श्री. शेंडगे	दंतचिकित्सक
५	डॉ. सुनील कुबेर	अल्ट्रासोनोलॉजिस्ट
६	डॉ. विश्राम मेहता	अल्ट्रासोनोलॉजिस्ट
७	डॉ. नितीन वाधवानी	रेडिऑलॉजीस्ट
८	डॉ. श्रीमती. गायत्री होशींग	नेत्ररोग तज्ज्ञ
९	डॉ. श्रीमती. छाया पुरोहित	पौंगडावस्था सल्लागार
१०	श्री. अभिजीत मुळीक	ऑडिओलॉजी तंत्रज्ञ

अहवाल सालात विविध रोगांवर उपचार घेतलेल्या रुग्णांची एकूण संख्या : १९७१०

१.	दंतचिकित्सा विभाग	३४७
२.	स्त्री रोग व प्रसुति विभाग	६५
३.	अस्थिरोग विभाग	३३३
४.	कान,नाक,घसा चिकित्सा विभाग	२४३
५.	'क्ष' किरण विभाग	४५९
६.	अल्ट्रासोनोग्राफी विभाग	१५३
७.	प्रयोगशाळा विभाग	११२३
८.	इंजेक्शन व ड्रेसींग विभाग	१०९८
९.	डिस्पेन्सरी विभाग	१५५७२
१०.	श्रवण दोष विभाग	२१
११.	नेत्र चिकित्सा विभाग	२९६

अहवाल सालात चिकित्सायीन प्रयोगशाळा नेत्र चिकित्सा व कान, नाक, घसा विभागाचे १२ व्या पंचवार्षिक योजनेतील मंजूर अनुदानामधून आधुनिकीकरण करण्यात आले.

१	फुल्ली ॲटोमॅटीक हिमॅटोलॉजी ॲनालायजर	प्रयोगशाळा विभाग
२	वातानुकुलित यंत्र	प्रयोगशाळा विभाग
३	ऑटो रिफ्रॅक्टोमिटर वुईथ केरॉटोमिटर	नेत्र चिकित्सा विभाग
४	नॉन कॉन्टॅक्ट टोनोमिटर	नेत्र चिमित्सा विभाग
५	हेडलाईट वुईथ बॅटरी व मिनी ऑटोस्कोप	कान, नाक, घसा विभाग
६	डिजिटल वेईग मशिन	--
७	बी.एम.आय.मशिन	--
८	डेस्कटॉप्स व लॅपटॉप्स	--

अहवाल सालात ७५६ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ७५५ विद्यार्थी यांची मोफत वैद्यकिय तपासणी करण्यात आली.

आरोग्य केंद्रामार्फत अहवाल सालात घेण्यात आलेले वैद्यकीय उपक्रम

१. विद्यापीठातील अधिविभागात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीचे वैद्यकीय तपासणी शिबीर.

२. नियमित सेवेतील कर्मचाऱ्याकरिता वैद्यकीय तपासणी शिबीर.

३. कोल्हापूर महानगरपालीका आरोग्य विभागाच्या सहकार्याने पल्स पोलीओ डोस मोहीम.

४. विविध अधिविभागात रक्तदान शिबिरांचे आयोजन.

५. रक्तातील चरबीचे प्रमाण मोजण्यासाठी मोफत तपासणी कॅम्प

६. विद्यार्थीनीकरीता वस्तीगृहामधे स्त्रियांचे आरोग्य. ॲनिमिया लसीकरणाचे महत्त्व या विषयावर वेळोवळी व्याख्याने आयोजन.

७. सर्पदंशांवर उपचार तसेच नेत्रदान पंधरवड्यातील नेत्रदानाचे महत्त्व या विषयावर प्राणिशास्त्र अधिविभागामध्ये व्याख्याने आयोजन.

उद्यान अहवाल

अहवाल सालात उद्यानातील सर्व कामे, माळी सेवक व 'कमवा आणि शिका' या योजनेतील पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थींनी यांचे मदतीने वर्षभर करण्यात आली. या विभागाने सेंट्रल सर्कल, अतिथीगृह परिसर, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने, ग्रंथालय, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा बगीचा व क्रांतीवन इ. यांची देखभाल करून बागा सुशोभित ठेवल्या. वेळोवेळी विद्यापीठांत होणाऱ्या सभा-समारंभाना व अधिविभागातील विविध समारंभाकरिता शोभिवंत फुलझाडांच्या कुंड्या, फुलदानी व गुच्छांचा पुरवठा केला. तसेच या विभागाने गवत व फळ विक्री (चिंच, नारळ इ.) केली.

अहवाल सालात राष्ट्रीय सेवा योजना विभागांकडून हिवाळयात शिबीरामधून फळबागातील व रस्त्याकडील स्वच्छता करणेत आली. यावर्षी रोपवाटीकेमध्ये क्रोटॉन, ॲकेलिफा, रातराणी, अलामेंडा, मोगरा, जास्वंद, लॅटेना इ. शोभीवंत रोपे विद्यापीठ नर्सरी मध्ये तयार करण्यात आली. तयार करणेत आलेली शोभिवंत रोपे कर्मचारी व अधिकारी यांचे निवासस्थानासमोर लावण्यासाठी देण्यात आली. या वर्षात उंबर, चिंच, जाभुंळ व विलायती चिंच इ. जंगली झाडे व फळझाडे अशी एकूण ४५० रोपांची लागवड करण्यात आली.

विद्यार्थी वसतिगृह

विद्यापीठ परिसरमध्ये विद्यार्थ्यांसाठी तीन वसतिगृहे आहेत. सदर वसतिगृहामध्ये पदव्युत्तर विभागातील एम. ए, एम एस्सी, एम. कॉम, एम. बी. ए., एम टेक, एम. फिल., आणि पीएच. डी. इ. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केली जाते.

शैक्षणिक वर्ष सन २०१७-२०१८ मध्ये वसतिगृह क्र १, २, ३ मध्ये एकून ६६४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. त्याच बरोबर अन्य विद्यापीठातून आलेल्या संशोधनार्थ, उजळणी व चर्चा सत्रासाठी आलेले प्राध्यापकांशिवाय बहि:स्थ परीक्षा किंवा विद्यापीठाच्या अन्य कामाकरिता आलेल्या काही विद्यार्थ्यांची राहण्याची सोय वसतिगृहामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार करण्यात आली होती. सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरीता खालील सोयी सुविधा पुरविल्या गेल्या होत्या.

१. मनोरंजनासाठी ५१ इंची कलर टी. व्ही. ६० चॅनेलची सोय केली आहे.

२. जनरेटर, सोलरवॉटरहिटरसिस्टीम, विद्यार्थ्यांना स्वच्छ, जंतुविरहित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी Water Purifier RO बसविला आहेत तसेच सर्व खोल्यामध्ये पंखे (फॅन) टयुबलाईट, मोबाईल चार्जसाठी स्वीच इ. सोयी पुरवल्या जातात.

३. वसतिगृह परिसरामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सिमेंटची बाके बसविण्यात आली आहेत.

४. बागबगीचा तयार केला आहे. सुमारे २५० देशी झाडांचे वृक्षारोपण करून संगोपन.

५. वसतिगृहाभोवती दगडी कंम्पाउड घातले आहे.

६. वसतिगृह परिसरामध्ये व्यायामाकरीता सिंगलबार, डबलबार बसविण्यात आले आहेत.

७. मर्क्युरी हॅलोजन लॅप वसतिगृह परिसरात बसविण्यात आले आहेत.

८. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिकेट, कॅरमबोर्ड. हॉलीबॉल इ. साहित्य दिले जाते.

९. इंटरनेट सुविधा ५ कॅम्प्युटर, २० लॅपटॉप, इंटरनेटकनेक्शन, सोबत वसतिगृहपरिसर मध्ये मोफत Wi-Fi ची सुविधा पुरविणेत येते, वर्तमानपत्रे व मासिके. विद्यार्थ्यासाठी पुरवली जातात. विद्यार्थी वसतिगृहातील सर्व मेस 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर विद्यार्थी विद्यार्थ्यांच्यासाठी क्लब मेस पद्धतीने चालविल्या जातात.

१०. वसतिगृह क्र. २ व ३ च्या मेसच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी १३ रूम बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे ५२ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली आहे.

अ.न.	नांव	पदनाम
१.	प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर	चिफरेक्टर
२.	श्री. जी. जे. साळुंखे	रेक्टर
३.	डॉ. एस. पी. पंचगल्ले	रेक्टर
४.	डॉ. नंदकुमार मोरे	रेक्टर

विद्यार्थिनी वसतिगृह

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये विद्यापीठ धोरणानुसार विद्यापीठातील नियमित अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थिनींना प्रवेश देणेत येतो. विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये एकूण तीन वसतिगृहे व तीन मेस उपलब्ध आहेत. दरवर्षी तीन वसतिगृहामध्ये मिळून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींची संख्या १००० ते ११०० च्या आसपास असते. मात्र सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्शात १२९५ इतकी होती. या सर्व विद्यार्थिनींची व्यवस्था विद्यार्थिनी वसतिगृहात करणेत आली होती. या वसतिगृहाचे ध्येय 'To Provide Home Away From Home' वाक्य आहे. तसेच अन्य विद्यापीठांतून/तर विद्यापीठीय कामकाजाकरिता आलेल्या विद्यार्थिनींची सोय वसतिगृहात गेस्टचार्ज भरून करण्यात येते.

M.A., M.Com., M. Sc., MCA Science, MCA Commerce, B. Lib., M. lib., BJC, MJC, MBA, M.Ed., M. Phil., Ph.D., AGPM, L.L.M., M.S.W., MPSC/UPSC, Mass Communication, Library & Information Science या अभ्याक्रमाच्या विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रवेश दिला जातो.

वसतिगृहामध्ये उपलब्ध असणाऱ्या तीन मेस विद्यार्थिनींमार्फत क्लब सिस्टीमनुसार चालविल्या जातात. वसतिगृहात जेवण, पाणी, लाईट, वाचनालय, इंटरनेट, टीव्ही, डीटीएच यांच्या २४ तासांच्या सुविधांबरोबरच गिझर, सोलर सिस्टीमद्वारे गरम पाणी, R. O. चे पिण्याचे पाणी, प्रत्येक विंगकरिता स्पिकरची सोय, २४ तास सुरक्षा व्यवस्था, तातडीची वैद्यकिय सेवा, तसेच व्यायामाकरिता जिम, उपलब्ध केल्या आहेत. वसतिगृहामध्ये विद्यार्थिनीकरिता विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते.

विद्यार्थिनींच्या मनोरंजन तसेच इतर कौशल्यांकरिता वसतिगृहामध्ये अनेक खेळ तसेच स्पर्धांचे जसे - दांडीया, कोजागिरी पौर्णिमा, रांगोळी, खो-खो, कबड्डी, बॅडमिंटन, वक्तृत्व, एकपात्री प्रयोग, एकांकीका, मेहंदी, रांगोळी, केशरचना, पुष्परचना, सोलो डान्स, फॅशन शो, गायन, काव्यवाचन इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. वसतिगृहाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता एक कनिष्ठ सहाय्यक व १ रोजंदारी लिपिक, पाच शिपाई व करार पद्धतीवर ३ नाईट वॉर्डन काम करीत आहेत.

अ.न.	नांव	पदनाम
१.	डॉ. श्रीमती प्रतिमा पवार	चिफरेक्टर
२.	डॉ. यु. आर. पोळ	रेक्टर
३.	डॉ. आसावरी जाधव	रेक्टर
४.	डॉ. प्रतिभा देसाई	रेक्टर

वसतिगृहामध्ये विद्यार्थिनीकरिता विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते.

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमांची यादी सन २०१७-२०१८

क्रं.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरुप व प्रमुख उपस्थिती
१	१३/७/२०१७	हॉस्टेल स्वच्छता	तीनही वसतिगृहासभोवतालची स्वच्छता -सर्व विद्यार्थिनी, डॉ. प्रतिमा पवार(चिफरेक्टर), डॉ.प्रतिभा देसाई(रेक्टर)
२	२९/७/२०१७	कमवा आणि शिका विद्यार्थिनी	डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर),डॉ.ए.एस.जाधव (रेक्टर) विद्यार्थिनीचे स्वागत, कामाचे नियोजन, मेससंबंधी नियम, रॅगिंग माहिती व शासन याबाबत सूचना.
३	१०/९/२०१७	Health Awareness Programme	डॉ.रानडे (आरोग्य केंद्र,शिवाजी विद्यापीठ) डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर)
४	२२/९/२०१७	अँटी रॅगिंग कमिटी	कुलसचिव डॉ.नांदवडेकरसो, श्री.एस.डी.रेळेकर, श्री. बेलेकर यांनी अँटी रॅगिंग कमिटीद्वारे विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.
५	२/१०/२०१७	स्वच्छता अभियान - ''गांधी जयंती''	स्वच्छता अभियान - डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर), सर्व कर्मचारी
६	३०/१२/२०१७	डॉ.आप्पासाहेब पवार जयंती - ३६ वी पुण्यतिथी	प्रतिमा पूजन व त्यांचे विद्यापीठातील बहुमूल्य कार्याबद्दल माहिती-प्रबोधन. डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर) व सर्व कर्मचारी.
७	३/१/२०१८	सवित्रीबाई फुले जयंती	श्रीमती.ज्योती भालकर (ग्रामीण विकास-तालुका समन्वयक व श्रीमती प्रियदर्शनी चोरगे (स्वयंरोजगार व व्होकेशनल ट्रेनिंग) यांनी विद्यार्थिनीना सावित्रीबाईंचे कार्याविषयी/शैक्षणिक योगदानाविशयी प्रबोधनात्मक मार्गदर्शन-डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर) सर्व कर्मचारी वर्ग
८	१८/१/२०१८	बेटी बचाओ-बेटी पढाओ अभियान रॅली.	वसतिगृहातील विद्यार्थिनींना अभियानाबाबत प्रबोधनात्मक माहिती देणेत आली. डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर) डॉ.यु.आर.पोळ (रेक्टर) सर्व कर्मचारी वर्ग
९	२९/१/२०१८	Health Happiness Programme	तणाव मुक्त जीवन, योगा-प्राणायाम, एकाग्रता, - प्रात्यक्षिक मार्गदर्शन डॉ. अणिमा दहिभाते, डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर)
१०	८/२/२०१८	व्याख्यान भारतीय लोकशाही	महिलांना असणारे विविध अधिकार,स्वातंष्य,मर्यादा,स्त्री-पुरुष समानता,भारतीय लोकशाहीचे महत्व याविषयी वसतिगृहातील विद्यार्थिनींना प्रबोधनात्मक मार्गदर्शन. डॉ.भारती पाटील, डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर),सर्व कर्मचारी.
११	१०/३/२०१८	पर्यावरण संरक्षण शिबीर, घनकचरा व्यवस्थापन	डॉ. ए. एस. जाधव (रेक्टर), प्रा.डॉ.पल्लवी भोसले, डॉ. निलीशा देसाई

१२	२५.०३.२०१८	हॉस्टेल डे	डॉ. व्ही. डी. नांदवडेकर (कुलसचिव), डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), सर्व विद्यार्थिनी व कर्मचारी.

आस्थापना/पेन्शन विभाग

विद्यापीठातील दि. १ जुलै, २०१७ ते ३० जून २०१८ अखेर सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मयत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची माहिती खालीलप्रमाणे

सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यादी

अ.क्र.	नाव	पदनाम	जन्मदिनांक	सेवानिवृत्त दिनांक	शेरा
१	डॉ. ए. के. शर्मा	प्राध्यापक	१०/०१/१९५८	३१/०१/२०१८	
२.	डॉ. (श्रीमती) आर. एस. साळुंखे	प्राध्यापक	२०/०२/१९५६	२८/०२/२०१८	(दोन वर्षे मुदत वाढ धरून)
३.	श्रीमती एस. एम. पाटील	सहायक अधीक्षक	०१/०३/१९६०	२८/०२/२०१८	
४.	डॉ. जी. पी. भवाने	प्राध्यापक	१४/०३/१९५६	३१/०३/२०१८	
५.	श्रीमती एस. एस. पवार	वरिष्ठ सहायक	०१/०४/१९६०	३१/०३/२०१८	
६.	श्री. व्ही. एस. सावंत	सहा. कुलसचिव	२७/०५/१९६०	३१/०५/२०१८	
७.	श्री. एस. के. मोरे	अधीक्षक	०१/०६/१९६०	३१/०५/२०१८	
८.	श्री. आर. बी. डोकरे	प्रयोगशाळा परिचर	२१/०५/१९५८	३१/०५/२०१८	
९.	श्री. पी. जी. शिरगावे	हावलदार	०१/०६/१९५८	३१/०५/२०१८	
१०.	श्री. आर. एल. कांबळे	शिपाई	०१/०६/१९५८	३१/०५/२०१८	
११.	श्री. ए. एन. धनवडे	चौकीदार	०१/०६/१९५८	३१/०५/२०१८	
१२.	श्री. एस. डी. खामकर	चौकीदार	०१/०६/१९५८	३१/०५/२०१८	
१३.	श्री. बी. एम. सुतार	प्रयोगशाळा परिचर	०९/०६/१९५८	३०/०६/२०१८	

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन

शिवाजी विद्यापीठामध्ये एम.ए/एम.एस्सी./एम.कॉम. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत प्रवेश देण्यात येतो. या योजनेअंतर्गत विद्यार्थी भवनमध्ये राहून विद्यार्थी हा श्रमदान करुन स्वावलंबन तत्वावर शिक्षण घेतो. विद्यार्थी भवनमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी अनेक योजना आखण्यात येतात. त्या सर्व योजनामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन 'कमवा आणि शिका' ही कल्याणकारी योजना यशस्वी करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांच्यावर राहते. या सर्व योजनेतून येणारे उत्पन्न हे विद्यार्थी भवनच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये जमा केले जाते. या योजनेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय, जेवणाची सोय मोफत केली जाते. या योजनेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रवश फी व परीक्षा फी यामध्ये सवलत दिली जाते. या योजनेत विद्यार्थ्यांना दररोज ३ तास काम करावे लागते.

सन २०१७-२०१८ या प्रथम व द्वितीय वर्ष मिळून एकूण ८४ विद्यार्थी व ६७ विद्यार्थीनी असे एकूण १५७ विद्यार्थी, विद्यार्थी भवन मध्ये प्रवेशीत राहिले. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी स्वतंत्र वसतिगृह आहे. विद्यार्थीनींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यार्थीनी वसतिगृहात करणेत येते.

'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये खालील उपक्रम राबविण्यात आले

१) झेरॉक्स सेंटर

२) ग्रंथालय व अभ्यासक्रेंद मधील मदतनीसचे काम.

३) प्रशासकीय विभाग व अधिविभागातील काम करणे.

४) एन. एस. एस. च्या २१ मेळाव्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था करण्यात आली इ.

५) क्रीडा आणि उद्यान विभाग.

६) इंटरनेट हॉल

सन २०१७-२०१८ मध्ये विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवं साजरा केला त्यामध्ये खालील मान्ववरांनी विविध विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

१) डॉ .ए. एम. गुरव	प्राध्यापक, वाणिज्य अधिविभाग	कौशल्य विकास
२) डॉ. जी. एस राशनकर	प्राध्यापक, रसायनशास्त्र अधिविभाग	नेट/सेट

सन २०१७-२०१८ या षैक्षणिक वर्शामध्ये डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या 'कमवा आणि शिका' योजनेमधील खालील विद्यार्थी नेट/सेट परिक्षा पास झाले.

१) श्री. बाबूराव रमेश मांडके - भूगोल

इंटरनेट युनिट शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्थापना : **मार्च १९९९**

समन्वयक

शिक्षकांची माहिती : **डॉ. मि. ज. जोशी, समन्वयक इंटरनेट युनिट.**

तांत्रिक सहाय्य : **श्री. क. श्री. देवरूखकर**

इंटरनेट युनिट ची विभागणी नेटवर्क सेल, वेबसाईट सेल व ग्रंथालय इंटरनेट हॉल अशी करण्यात आलेली आहे. विद्यापीठ प्रांगणात संगणक जाळे उभारणे व इंटरनेट सेवा पुरविणेसाठी नेटवर्क सेल हे युनिट स्थापान करणेत आलेले आहे. प्रांगणातील २७ अधिविभाग व मुख्य प्रशासकीय इमारत काचतंतूनी (Optical Fiber Cable) जोडली आहे. जुलै २००१ पासून सर्वत्र इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

सध्या बी. एस्. एन्. एल्. कडून इंटरनेट सुविधेसाठी २२० एम. बी. पी. एस्. लीज्ड लाईन घेणेत आलेली आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क या योजने अंतार्गत विद्यापीठास १ जी.बी.पी.एस्. क्षमतेची लीज्ड् लाईन प्राप्त झालेली आहे. युनिटचे समन्वयक डॉ. मि. ज. जोशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. देवरऊखकर संपूर्ण नेटवर्क अद्यावत करणे व त्याची निगराणीकरणेचे काम पाहतात.

विद्यापीठाच्या कार्यालयीन संकेतस्थळाची वेबसाईटची स्थापना २० मे २००२ रोजी झाली असून संकेतस्थळ कक्ष (वेबसाईट सेल) मार्फत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईट्सची देखाभाल केली जाते. ४०० वेबपेजेस पेक्षा जास्त असे संकेतस्थळाचे स्वरूप आहे. विद्यापीठाच्या सर्व परिक्षा निकाल, संलग्न महाविद्यालयांची परिपत्रके, विविध कार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका, विविध निविदा पत्रके, नेमणूक व प्रवेश आदिंच्या जाहिराती व विविध अर्जाचे नमुने इत्यादी माहिती वेळोवेळी वेबसाईट मार्फत प्रसिद्ध केली जातात.

सदर विभागामार्फत १० पेक्षा जास्त ऑनलाईन यंत्रणा विकसित करून यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ऑनलाईन विद्यार्थी प्रत्याभरण यंत्रणा मागील सहा शैक्षणिक वर्षाकरिता राबविली असून नॅक समितीनेही याबाबता प्रशंसा केलेली आहे तसेच आधुनिक माहिती तांत्रज्ञानाचा वापर करून विव्द्त सभेचे विषय व सर्व अभ्यासक्रम सी. डी.च्या स्वरूपात दिल्यामुळे वेऴ पैसा व श्रम याची मोठ्या प्रमाणावर बचत झाली आहे. या व्यतिरीक्त ऑनलाईन शिवसंदेश हे विद्यापीठाचे मासिक व इंटरनेट हे महत्वाचे उपक्रम वेबसाईट सेल मार्फत सुरू आहेत. वरील विविध उपक्रमामुळे संलग्न महाविद्यालये विद्यार्थी व इतर वेबसाईटचा जास्ता वापर करीत असल्याचे सांख्यकीय माहिती वरून दिसून आले असून अधिकाधिक माहिती व सेवा सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने वेबसाईट सेल प्रयत्नशील आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून मुख्य ग्रंथालयात ४० संगणकांची इंटरनेट सुविधा असलेली प्रयोगशाळा (इंटरनेट हॉल) स्थापित करणेत आलेली आहे. विद्यापीठाच्या प्रांगणातील विद्यार्थी, संशोधक, अध्यापक त्यांच्या अध्ययनाकरिता सकाळी १०.०० ते रात्री ६.०० या वेळेत इंटरनेट सुविधेचा वापर करतात. दररोज ३५० ते ४०० विद्यार्थी संशोधक अध्यापक या सुविधेचा लाभ घेता आहेत.

याव्यतिरीक्त विद्यार्थ्यांना सी.डी. राईटिंगची सुविधा व छपाईची सुविधा सुद्धा विद्यार्थ्यांना देण्याता येत आहे. या ठिकाणी डॉ. मि. ज. जोशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. इंटरनेट युनिट विद्यार्थ्यांमध्ये आय.टी. विषयक जागृती होण्यासाठी अनेक उपक्रम केले.

अभियांत्रिकी विभाग

नवीन प्रस्ताव

१. यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागाकरिता इमारत बांधणे.

२. फॅकल्टी हाऊसकरिता इमारत बांधणे.

३. विद्यापीठ परिसरामध्ये कन्व्हेंशन सेंटर बांधणे.

४. मुलांचे वसतिगृह बांधणे.

५. विद्यापीठ परिसरांतर्गत पाणी वितरण नलिकांचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे.

६. विद्यापीठ परिसरात उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे बांधकाम करणे.

७. विद्यापीठ परिसरातमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम करणे.

८. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परीसराचे सुशोभिकरण करणे.

९. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत रिसर्च स्कॉलर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे

१०. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये शेती रसायने व किड व्यवस्थापन विभागाच्या इमारतीचे विस्तारीकरण करणेबाबत

११. तंत्रज्ञान अधिविभागाकरिता वर्कशॉप इमारत बांधणेबाबत

१२. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणेकरिता सब-वेचे बांधकाम करणे.

१३. विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाची इमारत बांधणे. दुसरा टप्पा

१४. वनस्पती शास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.

१५. भौतिक शास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.

१६. सी.एफ.सी. इमारतीचे नूतनीकरण करणे. दुसरा टप्पा

१७. परीक्षा भवन क्र. २ येथील स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे.

१८. ॲनेक्स इमारतीमधील स्वच्छता गृहाचे नूतनीकरण करणे.

१९. भाषाभवन इमारतीमध्ये इंग्रजी विभागाकरीता इमारतीचे विस्तारीकरण करणे.

२०. मानव्यशास्त्र इमारतीचे अंतर्गत नुतनीकरण करणे.

२१. कै. ग. गो. जाधव अध्यासन केंद्रासाठी वृत्तपत्र व संवादशास्त्र इमारतीचे विस्तारीकरण करणे.

२२. शिवाजी विद्यापीठ परिसरातीभोवती संरक्षक भिंत बांधणे.

२३. नॅनो सायन्स परिसरामध्ये स्नॅक्स स्पॉट बांधणे.

२४. शिवाजी विद्यापीठ परिसरातील जुन्या ग्रंथालय इमारतीच्या उर्वरित भागावर टीन शिट रुफिग करणे.

२५. शिवाजी विद्यापीठ सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर अंतर्गत दुरुस्ती व सजावटीची कामे करणे.

२६. शाहू सिनेट सभागृहाच्या कॉम्प्रेसर रूमचे स्थापत्य व अंतर्गत दुरूस्तीचे कामे करणे.

शिवाजी विद्यापीठ परिसरातील पूर्ण झालेली व सुरू असलेली मुख्य बांधकामे.

१. शाहू सिनेट सभागृह अद्यावत करणे.

२. शिवाजी विद्यापीठ मुख्य इमारतीमध्ये मिटींग हॉल करणे.

३. संख्याशास्त्र अधिविभागामध्ये प्रयोगशाळेतील अंतर्गत फर्निचरचे काम करणे.

४. सी.एफ.सी. इमारतीचे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करणे. पहिला टप्पा.

५. विमान इमारतीचे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करणे

६. जिम्नॅशिअम हॉलचे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करणे
७. दूरशिक्षण केंद्र येथील अंतर्गत प्रवेशप्रक्रिया विभागामध्ये कामे करणे.
८. विद्यापीठ परिसरामध्ये आर.सी.सी. पाण्याची टाकी बांधणे.
९. विद्यापीठ परिसरातील लोककला केंद्र ते फाटक क्र. ८ पर्यंतच्या रस्त्याच्या बाजुचे सुशोभिकरण करणे.
१०. राजर्षी शाहु संशोधन केंद्रातील दुरुस्तीची कामे करणे.
११. विद्यापीठ परीसराभोवती संरक्षण भिंत बांधणे.
१२. मा. कुलसचिव निवासस्थानाभोवती संरक्षण भिंत बांधणे.
१३. विद्यापीठ परिसरामध्ये आर.बी.आय. तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ता करणे.
१४. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये लांब उडी, भालाफेक, उंच उडी, गोळा, थाळी फेक इ. करिता मैदान तयार करणे.
१५. मुख्य उपाहारगृहाचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे.
१६. व्ही. आय. पी. अतिथीगृहाचे विस्तारीकरण करणे.
१७. युसिक इमारतीचे पत्रे बदलणे व फलोरींग करणे.
१८. जुन्या अतिथीगृहाचे बाह्य रंगकाम करणे.
१९. मुद्रणालय इमारतीमध्ये अंतर्गत दुरूस्तीची कामे करणे.
२०. लोककला केंद्र येथील संरक्षण भिंतीचे विस्तारीकरण करणे.
२१. अतिथीगृह येथे अभ्यागत कक्षाचे व स्वच्छतागृहाचे बांधकाम करणे.
२२. जुन्या ग्रंथालय येथील पोर्चसाठी जलप्रतिबंधक उपाययोजना करणे.
२३. कमवा व शिका मुलांचे वसतिगृह प्रवेशद्वार येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे.
२४. मा. प्र-कुलगुरू निवासस्थानाकरिता ॲल्युमिनियम खिडक्या बसविणे.
२५. रिसर्च स्कॉलर वसतिगृहाशेजारी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे.
२६. संगीतशास्त्र तलावाशेजाराचा परिसर सुशोभित करणे.
२७. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्यासाठी नवीन स्वच्छतागृह बांधणे.
२८. भाषाभवन इमारतीअंतर्गत मराठी व इंग्रजी व विदेशी भाषा विभागांचे अंतर्गत रंगकाम करणे.
२९. डी. आर. डी. ओ. पद्धतीने ९००० क्षमतेचे बायोडायजेस्टर बसविणे.
३०. परिसरामध्ये सुतार विहीर ते नूतन विहीर अशी पी.व्ही.सी. नलिका बसविणे.
३१. ॲम्पीथियेटर येथे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करणे.
३२. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी नामफलक, दिशादर्शक बसविणे.
३३. तंत्रज्ञान अधिविभाग परिसरामध्ये बायोगॅस प्लँन्ट बसविणे.
३४. विद्यापीठ परिसरामध्ये रिसर्च स्कॉलर विद्यार्थी वसतिगृह बांधणे.
३५. रिसर्च स्कॉलर विद्यार्थी वसतिगृहाकरीता स्वतंत्र भोजनकक्ष बांधणे.
३६. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत कमवा व शिका मुलींचे वसतिगृहाचे पहिला व दुसरा मजला बांधकाम करणे.
३७. विद्यापीठ परिसरातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची इमारत बांधणे.
३८. विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाची इमारत बांधणे.
३९. शाहू इतिहास व संस्कृती संशोधन केंद्र.
४०. शिवाजी विद्यापीठ परीसरातील रस्ते करणे व वाहनतळ तयार करणे

४१. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत शिवाजी विद्यापीठ परीसरातील संख्याशास्त्र अधिविभागाचे विस्तारीकरण करणे.

४२. मा. कुलगुरू निवास्थानाचे विस्तारीकरण करणे.

४३. भूगोल अधिविभाग इमारत येथे आय.जी.टी.आर. केंद्र स्थापित करणे.

४४. जुन्या अतिथीगृहाचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे.

४५. पर्यावरणशास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.

४६. मुद्रणालय विभागाकरिता गोडाऊन बांधणे.

४७. मानव्यशास्त्र इमारत येथे स्वच्छतागृह बांधणे.

४८. परीक्षाभवन येथील आयटी. सेल अंतर्गत

४९. रसायनशास्त्र अंतर्गत ॲनिमल हाऊस दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करणे.

मुद्रणालय विभाग

उपरोक्त संदर्भीय टिपणीनूसार शिवाजी विद्यापीठातील मुद्रणालय विभाग हा मा.कुलसचिव यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्यरत असून विभागातील कार्यालयामध्ये १ अधिक्षक, १ क्लार्क छपाई विभागात ४, बांधणी विभागात ६ कायमस्वरूपी कर्मचारी व ३० रोजंदारी कर्मचारी काम करतात.सन १ जूलै २०१७ ते ३० जून २०१८ पर्यंत झालेल्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	विभाग/अधिविभागाचे नाव	तपशिल	संख्या
१	परीक्षा गोडावून विभाग	उत्तरपत्रिका छपाई महाविद्यालयीन परीक्षा (केशरी कलर)	२४ पानी - १३ लाख ४ पानी - १ लाख
		विद्यापीठ परीक्षा (ब्लॅक कलर)	४ पानी - ७ लाख २४ पानी - ११ लाख ३६ पानी - २ लाख ४० पानी - ५ लाख
२	दूरशिक्षण विभाग	बी.ए. पुस्तक छपाई एम.ए. पुस्तक छपाई बी.कॉम पुस्तक छपाई एम.कॉम एम.एस्सी एम.बी.ए माहितीपुस्तिका	२५ पुस्तके ६१ पुस्तके ८ पुस्तके ५ पुस्तके ४ पुस्तके २१ पुस्तके ५ पुस्तके
३	अभ्यास मंडळे विभाग	पर्यावरणशास्त्र मराठी पर्यावरणशास्त्र इंग्रजी	२५,००० प्रती २५,००० प्रती
४	इतर सर्व विभाग :- परीक्षा फॉर्म, पावती, पावती पुस्तके, लेजर, ब्राऊशर, पाम्पलेट, सर्टिफिकेट इ.		

१२. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा

प्रकरण तिसरे : विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा

३.१ अधिसभा

अहवाल वर्षात अधिसभेच्या तीन बैठका झाल्या. या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे –

- **पहिली सभा**

२६ जुलै, २०१७

सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीच्या विद्यापीठाचा नवीन शैक्षणिक बृहत आराखडा मान्यतेसाठी शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

- **दुसरी सभा**

२६ फेब्रुवारी, २०१८

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३०(४) (f), (g), (h), (i) अन्वये व्यवस्थापन परिषदेवर अनुक्रमे प्राचार्य, शिक्षक, संस्थाचालक आणि नोंदणीकृत पदवीधर गटातून अधिसभा सदस्यांमधून खालीलप्रमाणे सदस्य निवडून देण्यात आले.

प्राचार्य

१. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे

२. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर तुकाराम कारंडे

शिक्षक

१. डॉ. गायकवाड निखिल बब्रुवान

२. श्री. कुंभार प्रकाश गणपत

संस्था चालक

१. ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील

२. श्री. राजुबाबा जयवंतराव आवळे

नोंदणीकृत पदवीधर

१. श्री. संजय पांडुरंग जाधव

२. श्री. लोभाजी तातेराव भिसे

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३२(३)(h) अन्वये अधिसभेने विद्या परिषदेवर श्री.प्रताप यशवंतराव माने यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७०(३)(e), (f), (g) अन्वये विद्यापीठ स्थायी समितीवर अधिसभा सदस्यांमधून खालीलप्रमाणे सदस्य निवडून देण्यात आले.

एक प्राचार्य	– प्राचार्य डॉ. लालासाहेब गणपती जाधव
एक अध्यापक	– डॉ. वसंत मारूती पाटील
एक नोंदणीकृत पदवीधर	– श्री. मधुकर मुकुंद पाटील

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ७९(३)(e) अन्वये विद्यापीठ तक्रार निवारण समितीवर अधिसभा सदस्यांमधून डॉ. निखिल बब्रुवान गायकवाड यांना निवडून देण्यात आले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (२) (d) अन्वये महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी करण्यासाठी डॉ. किशोर जाधव यांना निवडून देण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती निवड व छाननी समितीवर अधिसभेच्या सदस्यांमधून डॉ. एस. आर. घाटगे यांना निवडून देण्यात आले.

- **तिसरी सभा**

  २७ मार्च, २०१८

  सन २०१६-१७ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरिक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मान्य करण्यात आले.

  विद्यापीठाचे सन २०१७-२०१८ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१८-२०१९ चे वार्षिक अंदाजपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार मान्य करण्यात आला.

३.२ व्यवस्थापन परिषद

अहवाल वर्षात व्यवस्थापन परिषदेच्या दहा बैठका झाल्या. या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे

- **४ जुलै, २०१७**

  Minutes of the committee for Reliance Jio proposal for Wi-Fi facility at university campus is approved.

  विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे जुलै, २०१७ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सहायता निधीला देण्यास मान्यता देण्यात आली.

- **१९ ऑगस्ट, २०१७**

  १) राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, साखराळे, ता.वाळवा, जि.सांगली या महाविद्यालयामध्ये त्यांच्या स्वनिधीमधून Electromechanical and Civil Incubation Centre सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

  २) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगट समितीने तयार केलेला विद्यापीठाच्या दैनंदिन कामकाजासंदर्भातील **Organogram (Tree Structure), Work Flow Chart,** कार्यसूची, कामकाजपद्धतीचा सर्वसाधारण आराखडा मान्य करण्यात आला.

  ३) पन्हाळा ते पावनखिंड ट्रेकींग शिबीराचे शिव-पावन ट्रेकींग शिबीर असे नाव देण्यात आले. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे प्रायोगिक दृष्ट्या विद्यापीठ पातळीवर पन्हाळा ते पावनखिंड असे शिव-पावन ट्रेकींग शिबीर आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

  ४) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व जिल्हा प्रशासन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शासन योजना, विविध उपक्रम राबविणे तसेच प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी सामांजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

- **९ ऑक्टोबर, २०१७**

  - रसायनशास्त्र अधिविभागामार्फत "**Advances in Chemical Sciences (IC-ACS 2018)**" या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.
  - Shivaji University, Kolhapur आणि School of Business and Economics, Kisii University, Kenya यांच्या दरम्यान करावयाच्या सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली.
  - शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन २०१६-२०१७ चा निकाल जाहीर करण्याबाबत परिनिरीक्षण अहवाल व नियतकालिक स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.
  - Shivaji University, Kolhapur आणि Infosys BPO Limited, Mysore यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

- 'प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार' योजनेची अंमलबजावणी सन २०१७ या वर्षाकरिता चालू ठेवण्याच्या अनुषंगाने मा. प्र. कुलगुरू यांनी सूचित केल्याप्रमाणे प्रस्तावित समिती गठित करण्यास मान्यता देण्यात आली. वर्ग १ आणि वर्ग २ साठी स्वतंत्र आदर्श अधिकारी पुरस्कार देण्यास मान्यता देण्यात आली.
- विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाचे Green Audit करण्यासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभागाने तयार कलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला.
- शिक्षणशास्त्र अधिविभागामार्फत व इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग, संचालक IQAC, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने Curriculum Reforms and Higher Education: Global Scenario या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

◆ **२२ जानेवारी, २०१८**

- प्रकाशन विभागाकडील इतर प्रकाशनाची पुस्तके E SUK Online माध्यमातून विक्री करणेसाठी नवीन सेवाप्रणालीचे नाव शिव ग्रंथ भांडार असे ठेवण्यात आले. सुचविलेल्या नावाकरिता प्रथम आलेल्या स्पर्धकास विद्यापीठातर्फे रू. १०००/- व पुस्तक भेट देण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील अशा सर्व सेवा एकत्रित 'शिवालय' या लिंकखाली उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.
- राजारामबापू कॉलेज ऑफ शुगर टेक्नॉलॉजी, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली या महाविद्यालयामध्ये रू. ५,०००/- शुल्क आकारून Technology Business Incubation Centre सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.
- मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मा.कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून 'विज्ञानकथा कार्यशाळा' ही तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकरिता गृहबांधणी आर्थिक अग्रीम योजनेकरिता भविष्य निर्वाह निधीच्या व्याजदरापेक्षा २०% जास्त व्याजदर आकारून गृहबांधणीसाठी वार्षिक व्याजदर निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली.
- National Manuscript Mission (NMM) यांच्या बरोबर सामंजस्य करार (MOU) करणेस मान्यता देण्यात आली.
- Shivaji university, Kolhapur आणि National Taiwan University of Science Technology यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.
- Shivaji University, Kolhapur आणि National Tsing Hua University, Taiwan यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

◆ **७ फेब्रुवारी, २०१८**

- श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा हा जन्मदिन मराठी भाषा गौरवदिन म्हणून विद्यापीठामार्फत साजरा करण्यास मान्यता देण्यात आली.
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे नामकरण बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र असे बदलणेस मान्यता देण्यात आली.
- मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने 'रायगड - परिक्रमा शिवराजधानीची' उपक्रम आयोजन करण्यास मान्यता देण्यात आली.

◆ **३ मार्च, २०१८**

- Shivaji University, Kohapur and S. P. Jain Institute of Management and Resarch Mumbai यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.
- विद्यापीठाचे ISO मानांकन करून घेण्याबाबतचा अहवाल मान्य करण्यात आला.

- **१३ मार्च, २०१८**
  - वेब रेडिओ सुरू करणेसाठी संबंधित मार्गदर्शक सूचना मान्य करण्यात आल्या.
  - सामाजिक वनीकरणाकरिता विद्यापीठाच्या Synthetic Track ची पश्चिम / दक्षिण बाजूस भारतीय वाणाची किमान ४ फूट उंचीची १०,००० मोठी झाडे Group Plantation पद्धतीने लावण्यास मान्यता देण्यात आली.
- **२७ एप्रिल, २०१८**
  - विद्यापीठ नर्सरीतील शोभिवंत रोपे डीएसआर दर अधिक जीएसटी या दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.
  - शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागमध्ये Incubation Centre सुस्थापित करण्यास मान्यता देण्यात आली.
  - विद्यापीठाचा सन २०१६-१७ या वर्षाचा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल (AQAR) नॅक बेंगलोर यांना सादर करण्यास मान्यता देण्यात आली.
- **१९ मे, २०१८**

१. नवीन Royale 6 Seater Luxury electric car खरेदी करण्यास व Green Car चा चांगला विनियोग व्हावा या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी माहितीपर फलक लावणेस मान्यता देण्यात आली.

२. Shivaji University, Kolhapur and Samurddhi Tbi Foundation, Sangli यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

३. Shivaji University, Kolhapur, Maharashtra, India and National Centre for Nano sciences and Nanotechnology, University of Mumbai, Maharashtra, India यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

४. Shivaji University, Kolhapur (Department of Technology) and Theia New Consultancy LLP, Ghansoli, Navi Mumbai यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

५. Shivaji University, Kolhapur (Through Department of Technology) and INSTA VISION LABORATORIES AND SERVICES, Satara, Dist: Satara, Maharashtra, India यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

६. Shivaji University, Kolhapur (Though Department of Technology) and ABN Enterprises, Unchagaon, Kolhapur, Maharashtra, India यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

७. Shivaji University, Kolhapur (Through Department of Technology) and Mangalwedha Mines Pvt. Ltd, Mangalwedha, Dist. Solapur, Maharashtra, India यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

८. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखे अंतर्गत असलेले बी.ई. व एम.ई. पदव्यांचे नामाभिधान बी.टेक. व एम.टेक. असे करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

९. Shivaji University, Kolhapur (Department of Technology) and RCF Ltd, Thal Unit, Alibag यांच्या दरम्यान Tie-up करण्यास मान्यता देण्यात देण्यात आली.

१०. दूर शिक्षण केंद्राकडून तयार करण्यात आलेले पदवी व पदव्युत्तर स्तरावरील स्वयं अध्ययन साहित्याची सॉफ्ट कॉपी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यास मान्यता देण्यात आली.

◆ **१२ जून, २०१८**

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ७०(३)(d) नुसार स्थायी समिती करिता व्यवस्थापन परिषदेमधील सदस्य श्री. संजय जाधव यांचे स्थायी समिती सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात आले.
- एम.बी.ए. युनिट मध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून P. G. Diploma in E-Business हा कोर्स सरू करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
- दूर शिक्षण केंद्राअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून B. A., Home Science हा कोर्स सुरू करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठ परिसरातील नव्याने बांधणेत आलेल्या राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च अँड म्युझियम कॉमप्लेक्समध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू लोकजीवन वस्तू संग्रहालय, डॉ. अप्पासाहेब पवार, सुर्यकांत मांडरे, जगदीश खेबुडकर विविध दालनांची निर्मिती करणेस मान्यता देण्यात आली.

३.३ विद्यापरिषद

अहवाल वर्षात विद्यापरिषदेच्या दोन बैठका झाल्या. या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय खलीलप्रमाणे

◆ **३१ जुलै, २०१७**

- विविध संलग्नीत महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमांच्या प्राथमिक संलग्नीकरण, नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार, अतिरिक्त तुकडी इ. बाबत प्राप्त प्रस्तावांसदर्भात गठित स्थानिक चैकशी समितीचे अहवाल व छाननी समितीच्या अभिप्रायास अनुसरून मान्यता देण्यात आल्या.
- सर्व विद्याशाखेअंतर्गत भाग-१ पदवी अभ्यासक्रमांमध्ये 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या सक्तीच्या विषयाच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यास मा.कुलगुरू यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
- महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कायदयातील ८ विद्याशाखांचे व त्या अंतर्गत विषयांचे ४ विद्याशाखांमध्ये समायोजन करण्यास मा.कुलगुरू यांनी विद्यापरिषदेच्यावतीने मान्यता देण्याबाबत केलेल्या कार्यावाहीची नोंद घेण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ करिता विद्यापीठ संलग्नित व्यावसायिक महाविद्यालयाकडून ४० टक्के व १० टक्के जादा विद्यार्थी प्रथम वर्षाकरिता प्रवेशित करण्याकरिता प्राप्त मागणीच्या अनुषंगाने, विद्यापीठ निवड समितीद्वारा नियमित शिक्षक भरल्याची पडताळणी करून किमान २ शिक्षक नियुक्त केले असल्यास वाढीव तुकडी / विद्यार्थी संख्या मान्य करण्याचे अधिकार मा. प्रभारी प्र-कुलगुरू यांना देण्यात आले.
- शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ साठी जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर या महाविद्यालयातील बी. ए. भाग - २ व ३ अतिरिक्त तुकडी क्र. २ व बी. एस्सी. भाग - २ व ३ अतिरिक्त तुकडी क्र. २ या अभ्यासक्रमाच्या प्राथमिक संलग्नीकरणासंदर्भात गठीत स्थानिक चौकशी समितीच्या अहवालातील निरीक्षणे, अटी, शिफारशी व छाननी समितीचा अभिप्राय विद्यापरिषदेच्यावतीने स्वीकारणेबाबत मा.कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
- महाविद्यालयातील शिक्षकांच्या संशोधन पत्रिकातून प्रसिद्ध होणाऱ्या संशोधन निबंधामध्ये महाविद्यालयाचे नावासोबत Affiliated to Shivaji University, Kolhapur असा उल्लेख करण्यात यावा.

◆ **४ मे, २०१८**

- विविध संलग्नीत महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमांच्या प्राथमिक संलग्नीकरण, नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार, अतिरिक्त तुकडी इ. बाबत प्राप्त प्रस्तावांसदर्भात गठित स्थानिक चैकशी समितीचे अहवाल व छाननी समितीच्या अभिप्रायास अनुसरून मान्यता देण्यात आल्या.
- उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि. संदर्भ क्र. एनजीसी-२०१७ (१२८ /१७)/मशि-४ दि.०४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्याबाबतची विषद केलेल्या जलदगती कार्यपद्धती व

निकषांनुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांना शासन मान्यता न मिळाल्याने विद्यार्थी प्रवेशाबाबतचा प्रश्न गंभीर झाला होता या अनुषंगाने दि.२२/०९/२०१७ रोजी सादर केलेल्या टिपणी व शासनाच्या दि. १५/०९/२०१७ रोजीच्या पत्रात विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयात (कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा) कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये असे नमुद केल्यानुसार मंजुर प्रत्येक तुकडीमध्ये ४० टक्के विद्यार्थी प्रवेशित करण्याची बाब तसेच ४०% विद्यार्थी प्रवेशित करून देखील विद्यार्थी शिल्लक राहिल्यास संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून जितके जादा विद्यार्थी प्रवेशित करणार आहेत त्या विद्यार्थ्यांच्या संख्येचे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी समावून घेण्याबाबतचे हमीपत्र सादर करून त्याकरिता शुल्क रू. ७२०/- आकारून उर्वरीत विद्यार्थी प्रवेशित करण्याबाबत मा. कुलगुरू यांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

- ५४ व्या दीक्षान्त समारंभात पदवी, पदविका, प्रमाणपत्रे अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यास मान्यता देण्याबाबत मा.कुलगुरू यांनी विद्यापरिषदेच्यावतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
- यु.जी.सी., नवी दिल्ली यांचे २०१६ च्या राजपत्रातील व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार पदव्युतर शिक्षक मान्यता तसेच एम.फील. व पीएच.डी संशोधन मार्गदर्शक यांना मान्यता देण्याबाबत सुधारित नियमावली याबाबत अधिष्ठाता मंडळाच्या ठराव क्र. १ व २ मधील शिफारशी आणि पीएच. डी. प्रवेशसंदर्भातील R. R. D. 2.5 मधील तरतुदी सुधारित करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशी स्वीकारून सुधारित नियमावलीस मा. कुलगुरूसो यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेची नोंद घेण्यात आली.
- विविध महाविद्यालयांकडून सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात गठीत स्थानिक चौकशी समितीच्या सुधारित गुणांक पद्धतीने सादर केलेल्या अहवालातील निरीक्षणांच्या आधारे प्राप्त गुण, अटी, शिफारस व छाननी समितीचे अभिप्राय मान्य करण्यात आले.
- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून २०१० च्या अधिसुचनेमधील दि.०४ मे २०१६ व दि.११ जुलै, २०१६ रोजी केलेली अनुक्रमे तिसरी व चौथी सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषी विद्यापीठे व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याबाबत संकीर्ण-२००७/प्र.क्र.३३/१७विशि-१ दि.०४/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार एपीआय व पीबीएएस गुणांक मसुद्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यासाठी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार समिती गठित करण्यात आली होती सदर समितीने तयार केलेला मसुदा व १ ते ४ शिफारशी सुचविल्या होत्या त्या विद्या परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली आहे, मा. कुलगुरू यांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेल्या सदर कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या/येणाऱ्या नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरण, प्रयोगशाळा मान्यता, इत्यादी संलग्नीकरण प्रकार तसेच महाविद्यालये/संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या प्राथमिक संलग्नीकरण प्रकारांतील प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थानिक चौकशी समिती अहवाल, छाननी समित्यांचे अभिप्राय स्वीकारून मान्यता देणे, तसेच प्रवेश क्षमता घट, महाविद्यालय/विद्याशाखा/विषय, इ. बंद करण्याबाबत आणि एआयसीटीई, एनसीटीई, डीटीई, पीसीआय, बीसीआय इ. शिखर संस्थांच्या आदेशानुसार विद्यार्थी प्रवेश अथवा विद्यार्थी प्रवेश क्षमता, अभियांत्रिकी/व्यावसायिक महाविद्यालयांना देण्यात आलेली व द्यावयाची ना-हरकत प्रमाणपत्रे इ. मुद्दयांच्या अनुषंगाने विद्यापरिषदेच्या वतीने निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यास मान्यता देण्यात आली.
- एम.बी. ए. युनिट मध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून P.G.Diploma in E-Buisness हा कोर्स सुरु करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, अशी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.
- दूरशिक्षण केंद्राअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून B. A. Home Science हा कोर्स सुरू करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

१३ क्रीडा अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२०१७-१८ या शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत मिळालेले सुयश

वैयक्तिक व सांघिक मेडल्स

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये खालील खेळ प्रकारामध्ये विद्यापीठ संघाने सांघिक व वैयक्तिक यश सपंदान केले आहे.

१) कुस्ती फ्रि स्टाईल (महिला) व कुस्ती ग्रीक रोमन (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. ०३/११/२०१७ ते दि. ०५/११/२०१७ या कालावधीमध्ये महर्षि दयानंद विद्यापीठ, रोठक येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	वजन गट	पदक	पुरुष/महिला
१.	पाटील प्रताप पांडूरंग	६० किलो	कांस्य पदक	पुरूष (वैयक्तिक)
२.	पाटील स्वाती लालासो	६१ किलो	कांस्य पदक	महिला (वैयक्तिक)

संघव्यवस्थापक - प्रा. संभाजी पाटील, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स,सातारा.

प्रशिक्षक - प्रा. डी. के. पवार, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.

२) कुस्ती फ्रि स्टाईल (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. ०८/११/२०१७ ते दि. १०/११/२०१७ या कालावधीमध्ये महर्षि दयानंद विद्यापीठ, रोठक येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	वजन गट	पदक	पुरुष/महिला
१.	पाटील सौरभ अशोक	६१ किलो	कांस्य पदक	पुरूष (वैयक्तिक)
२.	शेटे विक्रम धनंजय	९१ किलो	कांस्य पदक	पुरूष (वैयक्तिक)

संघव्यवस्थापक - प्रा. के. आर. गावडे, एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली.

प्रशिक्षक - प्रा. बी. डी. पाटील, एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी.

३) बॉक्सींग (पुरुष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

दि. १८/११/२०१७ ते दि. २५/११/२०१७ या कालावधीमध्ये पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	वजन गट	पदक	पुरुष/महिला
१.	पवार केंदारनाथ अशोक	+९१ किलो	कांस्य पदक	पुरूष (वैयक्तिक)

संघव्यवस्थापक - डॉ. एस. टी. पाटील, मोहनराव पंतगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव.

प्रशिक्षक -प्रा. पी. एम. शिंदे, कृष्णा आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालय, वठार.

४) ॲथलेटिक्स (महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. १२/१२/२०१७ ते दि. १६/१२/२०१७ या कालावधीमध्ये आचार्य नागार्जुन विद्यापीठ, नार्गाजुनगर येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	खेळ प्रकार	पदक	पुरुष/महिला
१.	गुजर चैत्राली कालीदास	१०० मीटर धावणे	सुवर्ण पदक	महिला (वैयक्तिक)

संघव्यवस्थापक - डॉ. एस. जी. धुरे, आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज, गडहिग्लंज

प्रशिक्षक - डॉ. के. बी. बेल्लद, टि. के. कोळेकर आर्टस् व कॉमर्स कॉलेज, नेसरी

५) वेटलिटींग (पुरुष व महिला) व बेस्टफिजिक्स (पुरुष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :

दि. २०/१२/२०१७ ते दि. २३/१२/२०१७ या कालावधीमध्ये चंदीगड विद्यापीठ, मोहाली येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	वजन गट/खेळ प्रकार		पदक	पुरुष/महिला
१.	मलिक विशाल मारुती	५६ किलो	वेटलिटींग	कांस्य पदक (वैयक्तिक)	पुरुष
२.	चव्हाण रणजीत संजय	६९ किलो	वेटलिटींग	कांस्य पदक (वैयक्तिक)	पुरुष
३.	हनगडी रूपा महादेव	५८ किलो	वेटलिटींग	रौप्य पदक (वैयक्तिक)	महिला
४.	पवार श्रध्दा नारायण	६३ किलो	वेटलिटींग	कांस्य पदक (वैयक्तिक)	महिला
५.	मळगे अश्विनी राजेंद्र	+९० किलो	वेटलिटींग	सुवर्ण पदक (वैयक्तिक)	महिला
६.	कापरे ओंकार निलेश	+९० किलो	बेस्टफिजिक्स	रौप्य पदक (वैयक्तिक)	पुरुष

संघव्यवस्थापक – प्रा. प्रशांत पाटील, श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

प्रशिक्षक – प्रा. एस. एल. गोनुगडे, बी. पी. एड. महाविद्यालय, तारदाळ

६) अर्चरी (पुरुष व महिला) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :

दि. २६/१२/२०१७ ते दि. ३१/१२/२०१७ या कालावधीमध्ये के. आय. आय. टी. विद्यापीठ, भुबनेष्वर येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये खालील खेळाडूने यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळाडूचे नाव	खेळ प्रकार	पदक	पुरुष/महिला
१.	रोकडे मयुर सुधीर	७० मीटर रिक्व्हरी राऊड	सुवर्ण पदक (वैयक्तिक)	पुरुष
२.	जाधव अमिता सुनिल	५० मीटर इंडियन राऊड	रौप्य पदक (वैयक्तिक)	महिला
३.	जाधव अमिता सुनिल	इलिमेशन राऊड	कांस्य पदक (वैयक्तिक)	महिला

सांघिक खेळप्रकार (पुरुष)

१. रोकडे मयुर सुधीर	इलिमेशन राऊड सांघिक	रौप्य पदक
२. वाडकर अभिनंदन रवींद्र		
३. काटे रोहन मच्छिद्र		
४. परीट विवेक मनोहर		

सांघिक खेळप्रकार (महिला)

१. जाधव अमिता सुनील	इंडियन राऊड सांघिक	रौप्य पदक
२. कासुर्डे प्रियाका संतोष		
३. जाधव शिवाजी श्रीराम		
४. क्षीतीजा जयवंत		

संघव्यवस्थापक कम प्रशिक्षक – प्रा. एस. ए. पवार, किसनवीर महाविद्यालय, वाई.

७) खो-खो (पुरुष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :

विद्यासागर विद्यापीठ, मिडनापूर येथे दि. ०३ ते ०६ मार्च, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पुरूष खो-खो संघाने कांस्य पदक संपादन केले आहे. सहभागी खेळाडू खालीलप्रमाणे :

अ.क्र.	खेळाडूचे नांव	अ.क्र.	खेळाडूचे नांव
१.	गुणकी अरुण अशोक	२.	पाटील प्रधुन्य शिवाजी
३.	लांडे सुरज शितल	४.	फोंडे लक्ष्मण मायाप्पा
५.	राहुल लक्ष्मीकांत नोरजे	६.	निलेश आनंदा जाधव
७.	हंचनाळे ओंकार मारुती	८.	पोतदार सागर दीपकराज
९.	संकपाळ नयन रवींद्र	१०.	मासाळ अक्षय आनंदा
११.	कांबिरे प्रवीण प्रताप	१२.	तानाजी रामू सावंत

प्रशिक्षक - डॉ. डी. बी. बिरनाळे, नाईट कॉलेज, इचलकंरजी

संघव्यवस्थापक - प्रा. एस. ए. खरात, आर्ट्स ॲन्ड कॉर्मस कॉलेज, पुसेगाव

पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र झालेले संघ

१) बुद्धिबळ (महिला) पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. १०/११/२०१७ ते दि. १४/११/२०१७ या कालावधीमध्ये भोपाल विद्यापीठ, येथे झालेल्या पश्चिम विभागीय आतंरविद्यापीठ बुद्धिबळ (महिला) या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने **तृतीय क्रमांक** संपादन केला असून सदर ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

२) खो-खो (महिला) पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. ३०/११/२०१७ ते दि. ०३/१२/२०१७ या कालावधीमध्ये गुजरात विद्यापीठ, येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (महिला) या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने **तृतीय क्रमांक** संपादन केला असून सदर ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

३) बॅडमिन्टन (पुरुष) पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. १९/१२/२०१७ ते दि. २३/१२/२०१७ या कालावधीमध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बॅडमिन्टन (पुरूष) या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने **व्दितीय क्रमांक** संपादन केला असून के. आय. आय. टी. विद्यापीठ, भुवनेश्वर या ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

४) फुटबॉल (पुरुष) पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. २१/१२/२०१७ ते दि. २७/१२/२०१७ या कालावधीमध्ये जगरण विद्यापीठ, भोपाळ येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ फुटबॉल पुरुष संघाने **तृतीय क्रमांक** संपादन केला असून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

५) हॉकी (पुरुष) पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि. २६/१२/२०१७ ते दि. ३०/१२/२०१७ या कालावधीमध्ये गुजरात विद्यापीठ, अमहदाबाद येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ हॉकी पुरुष संघाने **प्रथम क्रमांक** संपादन केला असून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी पात्र झाला.

६) खो-खो (पुरुष) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा :

दि. १९/१२/२०१६ ते दि. २२/१२/२०१६ या कालावधीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ खो-खो पुरुष संघाने **तृतीय क्रमांक** संपादन करून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

गोल्ड मेडल	०५
सिल्व्हर मेडल	०५
कांस्य मेडल	१३
एकूण	**२३**

विभागीय क्रीडा स्पर्धा

सन २०१७-१८ साली खालील महाविद्यालयांनी विभागीय स्पर्धांचे यजमानपद भूषविले.

१. कोल्हापूर विभाग : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.

२. सांगली विभाग : डी. ए. बी. नाईक महाविद्यालय, चिखली

३. सातारा विभाग: के. बी. पी. अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

आंतर विभागीय क्रीडा स्पर्धा

सन २०१७-१८ साली विद्यापीठ क्रीडा व संवर्धन मंडळाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे आंतरविभागीय स्पर्धांची जबाबदारी खालील निर्देशिलेल्या महाविद्यालयांनी स्वीकारली व स्पर्धा यशस्वी पार पाडल्या.

१. व्हॉलीबॉल (महिला)	वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड
२. जलतरण (पुरुष व महिला)	दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
३. टेनिस (पुरुष व महिला)	एस. जी. आय., अतिग्रे
४. ज्युदो (पुरुष व महिला)	स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे
५. तायक्वांदो (पुरुष व महिला)	डी. आर. माने कॉलेज, कागल
६. बास्केटबॉल (महिला)	टी. के. आय. ई. टी., वारणानगर
७. क्रॉस-कंट्री (पुरुष व महिला)	कॉलेज ऑफ आटर्स, कोवाड
८. बुध्दीबळ (पुरुष व महिला)	डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज
९. खो-खो (महिला)	वारणा कॉलेज, एतिवाडे खुर्द
१०. हॅण्डबॉल (पुरुष)	एस. जे. आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली
११. सायकलींग (पुरुष)	सी. एस. एस. कॉलेज, हुपरी
१२. व्हॉलीबॉल (पुरुष)	एल. बी. एस. कॉलेज, सातारा
